दिनांक :– ११.०४.२०१९.

# प्रेसनोट

**आरोपी लोकसेवक** आरोपी लोकसेवक, बंडु केशव सांडभोर, वय ५० वर्षे व्यवसाय सरकारी नौकरी, अपर कोषागार अधिकारी, वर्ग –२, जिल्हा कोषागार कार्यालय हिंगोली, रा. हनुमान कॉलनी, हुतात्मा चौक, आळंदी रोड, भोसरी, पुणे –३९

---

पिडीत तक्रारदार हे सरकारी नोकर असून त्यांनी दि.११.०४.२०१९ रोजी तक्रार दिली की, राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना व डीसीपीएस (अंशदायी निवृत्ती वेतन योजना) मधुन त्यांच्या आईच्या वैदयकीय उपचाराकरिता २५ टक्के रक्कम मिळण्याकरीता त्यांच्या स्वत: च्या सरकारी कार्यालयात लेखी अर्ज केलेला होता. त्यांच्या सरकारी कार्यालयाने सदरचा प्रस्ताव हा पुढील कायदेशीर कार्यवाही करिता जिल्हा कोषागार कार्यालय, हिंगोली या कार्यालयात पाठविण्यात आलेला होता.

यातील आरोपी लोकसेवक हे जिल्हा कोषागार कार्यालय हिंगोली या कार्यालयात अपर कोषागार अधिकारी म्हणून कर्तव्यावर असून त्यांनी तक्रारदार यांचा प्रस्ताव हा जिल्हा कोषगार अधिकारी यांचे मंजुरी घेवून सदरचा प्रस्ताव पुढील कायदेशीर कार्यवाही करीता नॅशनल सिक्युरीटी डीपॉजीट लिमीटेड मुंबई या संस्थेकडे अखेरच्या मंजुरी मिळण्यासाठी मुंबई कार्यालयात पाठविण्यासाठी तक्रारदार यांच्याकडून रूपये १०००/– रू. लाचेची मागणी करून १०००/– रू. लाच स्विकारली म्हणून आरोपी लोकसेवक यांना लाचेच्या रकमेसह आज दि.११.०४.२०१९ रोजीचे १५.३५ वा. ताब्यात घेण्यात आलेले आहे. पुढील कारवाई सुरू आहे.

ही कामगिरी श्री.संजय लाटकर, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री रविंद्र थोरात यांनी पोलीस निरीक्षक श्री नितीन देशमुख, पोह श्री आढाव, श्री अभिमन्यु कांदे, पोह श्री विजय उपरे, पोना श्री संतोष दुमाने, पोना श्री शेख जमीर, श्री महारुद्र कबाडे, श्री विनोद देशमुख श्री अवि किर्तनकार, चापोशि श्री ठाकरे यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागा मार्फत मोबाईल ॲप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क्र.१०६४**, दुरध्वनी क्र.०२४५६–२२३०५५,
श्री संजय लाठकर, पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, लाप्रवि नांदेड.
मोबाईल क्रमांक. ९९२३०२८१२२, दुरध्वनी क्र ०२४६२–२५५८११.
मोबाईल क्रमांक ९८२३२१५१९५, ९९२००४९२३२ व ९९२३०४२५६५.

Scanned by CamScanner